# २१ व्या शतकातील भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध: परराष्ट्र धोरणातील बदल

प्रा.शिंदे ए.जे. के.एन.पी. कॉलेज, वाळवा ता. वाळवा, जि. सांगली

स्वातंत्र्यानंतरचे सुरुवातीचे परराष्ट्र धोरण आदर्शवादी होते.सन १९४७ ते १९९१ या काळातील भारताचे परराष्ट्र धोरण नेहरुंच्या आदर्शवादाने प्रभावित होते.तत्कालीन परराष्ट्र धोरणाची मुलभूत उदिदष्टये पुढीलप्रमाणे—

१) निर्णय स्वातंत्र्य
२) अहिंसा, शांतता व सहकार्य
३) अलिप्ततावाद
४) पंचशील धोरणाचापुरस्कार
५) लोकशाही समाजवाद
६) वसाहतवादाला विरोध, नि:शस्त्रीकरण

वरील धोरणावरती आदर्शवादाचा नेहरुंच्या विचारांचा पगडा अधिक होता. परंतू सन १९४५ ते १९९० चा शीतयुध्दाचाकाळ संपुष्टात आला. शीतयुध्दोत्तर काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाली. भांडवलशाहीचा जागतिक पातळीवरील प्रसार बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढतेजाळे, आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया इत्यादीमुळे जागतिकरणाला वेग आला.

१९९१ ला भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केल्याने आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करणे अपरिहार्य ठरले. बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या भूमिकेतून भारताने आपल्या परराष्ट्र धोरणातील उदिदष्टयामध्ये बदल केलेत यामध्ये विचारसरणीपेक्षा हितसंबंधांना महत्त्व, आर्थिक उदिदष्टांना महत्त्व, सुरक्षा परिषदेत कायम सभासदत्व मिळवणे, विभागीय पातळीवरती सहकार्य वाढविणे, विभागीय महासत्ता बनण्यासाठी प्रयत्न, जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्राची भूमिका निभावणे, अमेरिकेशी संबंध सुधारणे, दहशतवादाविरुध्द जागतिक जनमत संघटित करणे, बहुध्रुवीय विश्वरचनेचा प्रयत्न करणे इत्यादीचा समावेश दिसतो त्याचा थोडक्यात आढावा—

**१) विचारसरणी पेक्षाहितसंबंधांनामहत्त्व—**

शीतयुध्दाच्या काळात राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणात विचारप्रणालीला महत्व होते. परंतु १९९१ नंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात बदल घडून आलेत. सन २००३ च्या सी राजमोहन अहवालानुसार पुढील पाच बदल भारताच्या परराष्ट्र धोरणात झालेत.

१) आदर्शवादापेक्षा वास्तववादावर भर
२) समाजवादापेक्षा आधुनिक भांडवलवादी व्यवस्थेवर भर.
३) सामुहिक हितसंबंधापेक्षा व्यक्तिगत हितसंबंधावर भर.
४) राजकीय हितसंबंधापेक्षा आर्थिक हित संबंधावरती भर.
५) पश्चिम विरोधी धोरणाचा त्याग.

भारताने राष्ट्रीय हितसंबंधांना प्राधान्य देवून भारत अमेरिका संबंध सुधारलेत. १९९० नंतर भारत—अमेरिका नागरी आण्विक ऊर्जा करार, भारत—फ्रान्स अणुऊर्जा सहकार्य करार केलेत यावरुन भारताचे परराष्ट्र धोरण वास्तववादी बनत चाललेले दिसून येते.

**२) आर्थिक उदिदष्टांना महत्त्व—** भारताने परराष्ट्र धोरणात आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधाना महत्त्व दिले आहे. त्यासाठी भारताने आर्थिक राजनयाचा वापर करण्यास सुरुवात केली. राष्ट्रप्रमुखा सोबत भारतातील अनेक व्यापारी, उदयोगपतींना परराष्ट्र दौरयाच्या वेळी नेले जाते. भारताचे अनेक राष्ट्रांच्या बरोबर राजकीय प्रश्नांवरुन संघर्ष आहेत. परंतु त्याचा आर्थिक संबंधावरती परिणाम झालेला नाही. उदा. भारत—चीन सीमावाद, भारत—पाकिस्तान काश्मीरप्रश्न या वरुन वाद असले तरी व्यापार करताना त्यांना डवेज अिवनतमक दंजपवद दर्जा दिला आहे.

**३) युनोच्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व मिळविणे—** भारत युनोचा संस्थापक सदस्य आहे. भारताची अस्थायी सदस्य म्हणून २०१० पर्यंत सहा वेळा निवड झालेली आहे. गेल्या दीड शतकापासून कायम सदस्यत्वासाठी भारताने प्रयत्न सुरु केले आहेत. त्याच्या समर्थनासाठी दावेदारी करताना भारताने युनोच्या कार्यातील भारताचे योगदान दक्षिण आशियातील भौगोलिक स्थान, स्थिर लोकशाही शासन, आर्थिक विकास इत्यादी मुददे मांडलेत. त्याला रशिया, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जपान इत्यादी अनेक राष्ट्रांनी समर्थन केले आहे.

**४) विभागीय पातळीवरती सहकार्य वाढविण्यावरती भर—**१९८५ च्या सार्कच्या स्थापनेपासून भारतान विभागीय व विशेषत: दक्षिणपूर्व आशियाशी आर्थिक, व्यापारी, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, विज्ञान—तंत्रज्ञान इत्यादी पातळीवरती संबंध प्रस्थापित करण्यावरती भर दिला आहे. त्यासाठी आर्थिक सहकार्य, व्यापारी सवलती, दहशतवादी कारवाया रोखणे, परस्परांच्या सार्वभौमत्वाचा आदर करणे, दक्षिण आशियात मुक्त

व्यापारक्षेत्र निर्माण करणे. आपले प्रश्न शांततेच्या मार्गाने चर्चेद्वारे सोडविणे इत्यादी तत्वाचा स्विकार केला आहे.

**५) विभागीय महासत्ता बनण्यासाठीप्रयत्न–**

त्यासाठी भारताने अण्वस्त्र संपन्नता, भारताचा आर्थिक विकास, विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती, दहशतवादा विरुध्द आंतरराष्ट्रीय मोहिमेतील सहभाग, स्थिर लोकशाही इत्यादी मुददे समर्थनार्थ दिले आहेत. भारत विभागीय महासत्ता व्हावे अशी अमेरिकेची इच्छा आहे. कारण त्यामुळे चीनच्या वाढत्या सामर्थ्याला शह देता येईल.

**६) जबाबदार अण्वस्त्राधारी राष्ट्राची भुमिका–**

भारत स्वातंत्र्योत्तर काळापासून अण्वस्त्र निर्मितीच्या विरोधात होता. परंतु १९९० नंतर आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलती समीकरणे लक्षात घेऊन आत्मरक्षणासाठी भारताला अण्वस्त्रांचा विकास करावा लागला. १९९८ साली भारताने अणुचाचण्या घेऊन स्वत:ला अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून घोषीत केले. भारताने आपल्या नवीन आण्विक धोरणात भारत हे आत्मरक्षणाला आवश्यक तेवढयाच अण्वस्त्रांची निर्मिती करेल असे स्पष्ट केले आहे.

**७) दहशतवादाविरुध्द आंतरराष्ट्रीय जनमत उभा करणे–** दहशतवादाला बळी पडलेल्या राष्ट्रामध्ये भारत एक प्रमुख राष्ट्र आहे. भारतात पाक पुरस्कृत जम्मू–काश्मीरमधील दहशतवाद २६/११ चा मुंबई दहशतवादी हल्ला, जर्मन बेकरी बॉम्बस्फोट इत्यादी घटनांच्यामुळे भारत दहशतवादानी ग्रासला आहे. ११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेवरील दहशतवादी हल्याने दहशतवादाचे आंतरराष्ट्रीय स्वरुप जगापुढे आले. दहशतवादाच्या निर्मुलनासाठी भारताने अनेक राष्ट्रांच्या बरोबर द्विपक्षीय करार केले. हा प्रश्न युनोपुढे मांडला. दहशतवादाच्या विरोधी आंतरराष्ट्रीय जनमत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**८) बहुध्रुवीय विश्वरचनेच्या निर्मितीचे प्रयत्न–** १९९० नंतर जगात अमेरिका हीच जागतिक महासत्ता म्हणून पुढे आली. अमेरिकन अभ्यासकांनी नवीन– विश्वरचना ही एकध्रुवीय विश्वरचना असल्याचा दावा करण्यास सुरुवात केली. अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला शह देण्यासाठी रशिया,चीन, जपान, राष्ट्राशी सहकार्य करुन एक बहुध्रुवीय विश्वरचना निर्माणकरणे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे उदिदष्ट बनले आहे. भारताचे परराष्ट्र धोरण पाकिस्तान केंद्रित नसून दक्षिणपूर्व आशियायी बनत आहे. तसेच ते नव्या रुपात पुढे आले आहे. ते विभागीय व आंतरराष्ट्रीय घडामोडीवर लक्ष केंद्रित करणारे आहे. १९९१ मध्ये पी.व्ही. नरसिंहराव यांनी वरील उदिदष्टावरती भर देवून परराष्ट्र धोरण राबविलेत्याच्या नंतर सत्तेत आलेल्या बिगर कॉंग्रेस संयुक्त आघाडी सरकारने, एन.डी. ए. सरकारने, यु.पी.ए. सरकारने याच उदिदष्टावरती भर देवून परराष्ट्र धोरण पुढे सुरु ठेवल्याचे दिसते.

**निष्कर्ष–**१९९० नंतर भारताचे परराष्ट्र धोरण पुढील उदिदष्टांना केंद्रीभूत मानून नवीन बदलांना सामोरे जाताना दिसते.

१) राजकीय हितसंबंधापेक्षा आर्थिक हितसंबंधाना महत्त्व.
२) आर्थिक राजनयाला महत्त्व.
३) आदर्शवादापेक्षा वास्तववादावर भर.
४) दहशतवादाचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरुन उच्चाटन करणे.
५) विभागीय सहकार्य वाढविणे आणि विभागीय महासत्ता बनण्यासाठी प्रयत्न करणे.
६) पाकिस्तान केंद्रीत परराष्ट्र धोरणाचा त्याग करणे.
७) सामुहिक हितसंबंधापेक्षा राष्ट्रीय हितसंबंध जपण्याचा प्रयत्न.
८) राजकीय प्रश्नबाजूला ठेवून आर्थिक क्षेत्रातील सहकार्यावर भर.

संदर्भ–१) प्रा. रघुनंदन ध. वाराडकर –आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण विदया प्रकाशन, नागपूर
२) डॉ. शैलेन्द्र देवळाणकर–आंतरराष्ट्रीय संबंध,विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगापुरा, औरंगाबाद
३) प्रा.व्ही.डी. गायकवाड –जागतिकीकरणाचे भारताच्या परराष्ट्र धोरणावरील परिणाम प्रबोधन प्रकाशन ज्योती, फेब्रूवारी २०११, अंकदुसरा.
४) प्रा.डॉ. अशोक चौसाळकर –आंतरराष्ट्रीय राजकारण प्रबोधन प्रकाशन ज्योती, एप्रिल २०११, अंक चौथा